# जाहीर निवेदन

तमाम वित्तीय संस्था, शासकीय, निमशासकीय कार्यालय यांना या जाहीर निवेदनाव्दारे सुचित करण्यात येते की, नगर अर्बन को.ऑप.बँक लि., अहमदनगर (मल्टी स्टेट शेडयुल्ड बँक)(अवसायना अंतर्गत) या बँकेचा परवाना भारतीय रिझर्व्ह बँकेने दिनांक ०४/१०/२०२३ रोजी रद्द केलेला असून बँकेवर अवसायकाची नियुक्ती करण्यात आलेली आहे. बँकेचे सर्व बँकींग व्यवहार बंद झालेले आहेत. बँकेच्या ठेव पावत्याचा वापर करुन काही इसम, त्रयस्त वित्तीय संस्था, शासकीय, निमशासकीय कार्यालय यामध्ये बँकेच्या नावाने असलेल्या ठेव पावत्या सादर/डिपॉझिट करुन त्यानुसार शासकीय टेंडर अगर तत्सम कार्यालयात सादर करुन त्याव्दारे आर्थिक लाभ, टेंडर अथवा तत्सम फायदा घेत असल्याचे निदर्शनास येत आहे. बँकेचा व्यवसाय परवाना रद्द झाल्याने बँकेने कोणतीही हमी घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही. अशा परिस्थितीत नगर अर्बन बँकेच्या ठेव पावतीव्दारे कोणीही कसलाही आर्थिक व्यवहार, टेंडर अगर तत्सम लाभ घेतल्यास त्यास बँकेची कोणतीही संमती व जबाबदारी नाही. याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसवणूक होऊ नये म्हणून या जाहीर निवेदनाव्दारे प्रसिध्द करत आहोत.